पोलीस उप आयुक्त वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल. बी. एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**OW/DCP TRAFFIC THN/ADM/NOTIFICATION / 39 /2022** DATE 20 /04/2022

**"वाहतुक नियंत्रण अधिसुचना"**

**ज्याअर्थी,** टाईम्स ऑफ इंडिया, मुंबई तर्फे दि. २२/०५/२०२२, दि. २९/०५/२०२२, दि. ०५/०६/२०२२ आणि दि. १२/०६/२०२२ असे प्रत्येक रविवारी सकाळी ०६:०० ते १०:०० वाजेपर्यत **"हॅप्पी स्ट्रीट"** कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रमाचे ठिकाणी अपघात होवून जिवितहानी होवू नये तसेच सदर परिसरात वाहतूक कोंडी होवू नये व वाहतूक सुरळीत, सुनिश्चित होणे करीता नागरिकांच्या सोईसाठी,

**त्याअर्थी,** मी बाळासाहेब पाटील, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे:–

**प्रवेश बंद –** पायलादेवी मंदिराकडून महापौर बंगल्याकडे जाणाऱ्या लेनवर सर्व प्रकारच्या वाहनांना पायलादेवी मंदिर येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने महापौर बंगल्याकडून पायलादेवी मंदिराकडे जाणाऱ्या लेनवरून इच्छित स्थळी जातील.

सदरची वाहतूक अधिसूचना दि. २२/०५/२०२२, दि. २९/०५/२०२२, दि. ०५/०६/२०२२ व दि. १२/०६/२०२२ रोजी सकाळी ०६:०० ते १०.०० वाजेपर्यत अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसूचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( बाळासाहेब पाटील )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय ठाणे.

२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

<u>प्रत माहितीसाठी सादर</u>

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे

मा. जिल्हाधिकारी, ठाणे

मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर

**प्रत कार्यवाहीकरीता :—**

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.

नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे.

परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

**प्रत** :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/— सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :— समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे

२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :— सपोआ वाहतूक विभाग, वागळे व पो.निरी. वागळे वाहतूक उप विभाग.

२/— म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावी.